MHST060008402022

**संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. २६५/२०२२**

**शासन विरुध्द गणेश**

**न्यायनिर्णय निशाणी क्र. ०५ प्रमाणे**

(पारीत दिनांक १९.०४.२०२३)

अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता सौ. एस.एस. कुलकर्णी व आरोपीतर्फे वकील श्री. एम.एन. गेजगे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

०२. अभियोग पक्षाचा पुरावा व आरोपीचा बचाव लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्ष सिध्द् करतो काय की, दि. २१/१०/२०२२ रोजी १६.४५ वाजेचे सुमारास मौजे दहिवडी, ता. माण, जि. सातारा गावच्या हद्दीत बिदाल चौक ते तुपेवाडी रस्त्यावरील भुमी अभिलेख कार्यालयासमोर आरोपी हा त्याच्या ताब्यातील सॅन्ट्रो कंपनीची गाडी नोंदणी क्र. एच.एच. ०२/के.ए. २३७७ ही दारुच्या अंमलाखाली वेडी-वाकडी चालवित असतांना मिळून आला ? | **... नकारार्थी** |
| २) | काय आदेश ? .................... आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. | |

**-: का र ण मि मां सा :-**

**मुद्दा क्रमांक १ करीता :-**

०३. अभियोगपक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेला आरोप सिध्द् करण्याकरीता केवळ सा.क्र. १ भामाताई भगवान काळे (फिर्यादी) याची साक्ष नोंदविली आहे.

अभियोग पक्ष उर्वरित साक्षीदारांची उपस्थिती संपादित करु शकला नाही. त्यामुळे निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये जबाणी निशाणी क्र. ०५ लगत नोंदविण्यात आली. त्यामध्ये आरोपीने सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तर देवून खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

०४. प्रस्तुत प्रकरणामध्ये साक्षीदार क्र. १ भामाताई भगवान काळे हया फिर्यादी असून त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.२१.१०.२०२२ रोजी त्या, श्री. जाधव व सौ. मोरे पो.नाईक असे पायी गस्तीवर असतांना तुपेवाडी ते बिदाल चौक येथे एक इसम त्याच्या ताब्यातील चार चाकी सॅन्ट्रो वाहन हे वाकडे–तिकडे चालवित असतांना दिसून आलेला. त्यामुळे त्यास थांबवून चौकशी केली असता आरोपीने त्याचे नाव गणेश तात्याबा गेजगे असे सांगितले. त्यावेळी आरोपीच्या तोंडाचा दारुचा उग्र वास येत असल्यामुळे त्यास पोलीस ठाण्यात नेले व नंतर वैद्यकिय तपासणीकरीता सरकारी दवाखान्यात पाठविले. आरोपीची वैद्यकिय तपासणी केल्यानंतर वैद्यकिय अहवालात आरोपी दारु पिल्याचे दिसून आलेला. त्यामुळे त्यांनी आरोपीविरुध्द पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली. त्यांनी फिर्याद (निशाणी क्र.७) व छापील फिर्याद (निशाणी क्र. ८) असे पुराव्यादरम्यान ओळखले आहे. फिर्यादीने उलटतपासात घटनास्थळावर रहदारी असल्याचे कबुल करुन इतर सुचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

०५. प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असतांना देखील तपासी अधिकारी यांनी त्रयस्त साक्षीदारांचे जबाब नोंदविले नसल्याचे दिसून येते. अभियोग पक्षास फिर्यादीने जरी साजेसा पुरावा दिला असला तरी इतर साक्षीदारांच्या

साक्षे अभावी आरोपीवरील आरोप अभियोग पक्ष सिध्द करू शकला नाही. त्यामुळे स्वतंत्र साक्षीदारांच्या पुराव्या अभावी आरोपी हा भुमी अभिलेख कार्यालय, दहिवडी यांच्यासमोर त्याच्या ताब्यातील सँन्ट्रो कंपनीची गाडी नोंदणी क्र. एच.एच. ०२/के.ए. २३७७ ही दारुच्या अंमलाखाली वेडी–वाकडी चालवित असतांना मिळून आला असा निष्कर्ष काढण्याकरीता सबळ पुरावा नाही. परिणामी मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविते व मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१) आरोपी गणेश तात्याबा गेजगे यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८५ या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) फौजदारी पक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) च्या तरतुदींच्या पुर्ततेसाठी आरोपीची जमानत पुढील सहा महिन्यांकरीता वाढविण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SHEETAL SHREERAM BAJAJ
Digitally signed by SHEETAL SHREERAM BAJAJ
Date: 2023.04.24 17:51:27 +0530

**(कु. एस.एस. बजाज)**

दिनांक : १९/०४/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.

**<u>-: प्र मा ण प त्र :-</u>**

सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजुकरातील शब्द न् शब्द मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | ए.एन. ओंबासे, |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी, ता. माण, जि. सातारा. |
| आदेश/न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक | : | १९.०४.२०२३. |
| आदेश/न्यायनिर्णयावर स्वाक्षरीत | : | २४.०४.२०२३. |
| सी.आय.एस. प्रणालीमध्ये अपलोड केल्याची तारीख | : | २४.०४.२०२३. |

सही/-

लघुलेखकाची सही